# MT- 162

**Seat No.** | | | | | | | |

**2013 .... .... 1100**

**MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - V**

**Time : 3 Hours** **(Pages 5)** **Max. Marks : 80**

---

**प्र.१. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

१) एकाच्या पाठोपाठ दुसरं, तिसरं ... नजर पाहू शकेल एवढी ..........
अ) शिखरंच शिखरं ! ब) डोंगरंच डोंगरं ! क) पर्वतंच पर्वतं !

२) अशा समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे ..........
अ) हे जग निर्माण झाले. ब) हे आनंदवन निर्माण झाले.
क) हे जंगल निर्माण झाले.

३) रामय्या धापा टाकीत ..........
अ) पळत आला. ब) वेगात आला. क) धावत आला.

४) सूर्याच्या पिवळ्या तांबूस आणि कोवळ्या किरणांत बाबूजी ..........
अ) अक्षरे चमकत होती. ब) अक्षरे रडत होती. क) अक्षरे हसत होती.

**प्र.१. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

१) कधीकधी .......... एकमेकांच्या सहवासात येतात आणि अचानक दोघांनाही प्रिय असलेला विषय निघतो. (दोन मित्र, दोन अबोल माणसे, दोन बोलकी माणसे)

२) सार्थक झालं आपल्या .......... (आयुष्याचं, जीवनाचं, समाजाचं)

३) मा शिरखुर्मा आठ - दहा घागरीच्या मोठ्या .......... करायची.
(कढईत, पातेल्यात, टोपात)

**प्र.१. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) लेखकाचे वडील स्वातंत्र्यआंदोलनात कोणत्या साली सहभागी झाले ?

२) कुष्ठरोगाच्या संशोधनासाठी बाबांनी काय देऊ केले ?

३) वसंत ऋतूचा काय साजरा करावा, असे लेखिकेला वाटते ?

**प्र.२. अ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) 'रस्ता म्हणजे केवळ दोन बिंदूंना जोडणारं अंतर नव्हे' असे पेंढारकरांना का वाटते ?

२) केशव आपल्या बंगल्याचे वर्णन कसे करतो ?

३) जितकी ओळख कमी, जितकी व्यक्ती अपरिचित तितका संवाद अधिक रंगतो, असे का म्हटले आहे ?

४) राजा रविवर्मा स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वाकडे भारल्यासारखे का पाहत होते ?

५) बाबा आमटे यांची संवेदनशील वृत्ती स्पष्ट करा.

**प्र.२. आ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

१) ''कारण माझा उपयोग जे व्यवस्थित करतात, तेच मोठे होतात, ज्ञानी होतात, विद्वान होतात.''

२) ''आपण बाहेर पडायचं आणि बघायची जागा सापटीत, वळचणीच्या जागी, जी असेल कोरडी आणि माणसाच्या दृष्टीनं अडनिडी.''

**प्र.३. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) संत सोयराबाई यांच्या मते संसाराचे सुख कशासारखे आहे ?

२) कवीच्या मते माणसाला काय म्हणून किंमत यावी?

३) कवीला शिवारात सावळ्या रूपात कोण दिसतो ?

**प्र.३. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

१) सावरीत जखम खोल, .......... आला जरी बोल.
(विश्वाचा, समाजाचा, जगाचा)

२) नभी फडफडे उंच .........., मनात गंगा, हिमनग रांगा. (तिरंगा, पतंगा, विहंगा)

३) बालरवि-किरणांची नाचे इथे .......... ! (प्रभावळ, ओहोळ, मोहोळ)

**प्र.४. अ) कोणत्याही <u>एका</u> पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

१) अवघा निरसला शीण । देखतां संतचरण ॥
आजि दिवाळी दसरा। सेना म्हणा आले घरा ॥

२) वळण वाकड्या नदीत आहे खळखळते पाणी
नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी

**प्र.४. आ) कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) कवीला आपल्या घरट्यात कोणकोणत्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात ?

२) अन्यायाविरोधात लढणारी स्त्री कोणकोणत्या रूपांत कवितेतून व्यक्त झाली आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

३) पंढरीनाथाचा महिमा संत नरहरी सोनार यांनी कसा वर्णिला आहे ?

४) प्रलय होताना कोणकोणता बदल कवीला अपेक्षित आहे ?

५) कवयित्रीने आपल्या देशातील वेगळेपण कसे वर्णिले आहे ?

**प्र.५. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

१) आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला का वाटले ?

२) 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते.' हे विधान पाठाच्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.

३) नागनाथअण्णा यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्यचळवळीत कसा भाग घेतला ?

४) रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना काय केले पाहिजे असे लेखिकेला वाटते ?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

१) 'नातवंडांस पत्र' या पाठाचा सारांश लिहा.

२) 'मुलांचे स्वप्न' या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.६. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

१) सहा महीन्यानंतर बाबूजी पून्हा आजारी पडले.

२) हिमालयाचं मला झालेलं पहिलं दरशन केवळ अविसमरणीय.

**प्र.६. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

१) भाजीपाला २) मायबाप ३) पासनापास ४) पंचारती

**प्र.६. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१) त्याची भाषा केवढी वेगळी ! (विधानार्थी करा)

२) हीच ओळख पुरेशी नाही. (प्रश्नार्थी करा.)

३) भई गल्लीत प्रत्येकाच्या घरी जाऊन आमंत्रण देत. (आज्ञार्थी करा.)

**प्र.६. ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(विपर्यास करणे, हर्षभरित होणे, स्तंभित होणे, अवाक्षर न काढणे, उपद्रव देणे, मन दुखावले जाणे)

१) वर्गात पहिला क्रमांक आला हे कळताच प्राजक्तास खूप आनंद झाला.

२) ताजमहालचे अप्रतिम सौंदर्य पाहून मुले आश्चर्यचकित झाली.

३) सुधीरने रवीला खूप समजावले पण रवीने त्याच्या सांगण्याचा चुकीचा अर्थ घेतला.

४) जेव्हा बाबा रागावतात तेव्हा घरात कोणीही काहीच बोलत नाही.

५) विनाकारण एखाद्याला त्रास देणे हा जणू महेशचा छंदच बनला आहे.

६) रमेशच्या खोचक बोलण्याने सर्वांच्या मनाला वाईट वाटले.

**प्र.७. अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** **4**

संयम हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. संयमावरच भारतीय संस्कृती उभारलेली आहे. आपण शंकराच्या देवळात जातो. बाहेर कासवाची मूर्ती असते. त्या कासवाचे दर्शन घेतल्याशिवाय शिवाकडे – मृत्युंजयाकडे – जाता येणार नाही. आणि कासव म्हणजे काय? कासव म्हणजे संयमाची मूर्ती. ते आपले सारे अवयव क्षणात आत घेते व क्षणात बाहेर काढते. स्वतःच्या विकासास अवसर असेल तर सारे अवयव बाहेर आहेत. स्वतःच्या विकासास धोका असेल तर सारे अवयव आत आहेत. असे हे कासव भारतीय संस्कृतीने गुरूस्थानी मानले आहे. ज्याला जगाचे स्वामी व्हायचे असेल त्याने आधी स्वतःचे स्वामी झाले पाहिजे. ज्याला देव आपलासा करून घ्यायचा आहे त्याने स्वतःचे मन आधी ताब्यात घ्यावयास शिकले पाहिजे.

**प्र.७. आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** **4**

१) **मुद्दे :-** एक राजा – राज्यातील लोक आळशी – त्यांना उद्योगी बनविण्याचा विचार – रस्त्यात एक मोठा दगड ठेवतो – त्याच्याखाली एक लहानशी पिशवी – अनेक लोक बाजूने जातात, पण तो दगड तसाच – एक गरीब मनुष्य तो बाजूला करतो – त्याला पिशवी दिसते – त्याला पिशवीतील सोन्याची नाणी मिळतात – बाजूला 'बक्षीस' अशी चिठ्ठी – लोक उद्योगी बनतात – तात्पर्य.

२) **मुद्दे :-** सिंह, कुत्रा व कोल्हा – मैत्री – शिकारीबाबत करार – शिकारीत तिघांचा सारखा वाटा – हरीण दिसणे – पाठलाग – सिंहाने ठार मारणे – समान वाटे – सिंह नाकबूल – सिंहाचा वाटा – कुत्र्याचा व कोल्ह्याचा वाटा एकट्या सिंहाने ताव मारणे – कुत्रा व कोल्हा दुबळे, अशक्त – शिकार दाखवूनही त्यादिवशी उपास – तात्पर्य.

**प्र.७. इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** **4**

१) आनंद / अनिता सावंत, विकास हायस्कूल, कन्नमवार नगर, पुणे, येथून शाळेच्या क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी प्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर, ए-५, इंद्रवदन सोसायटी, सेना भवन, दादर यांना निमंत्रित करणारे पत्र लिहित आहे. (लिफाफा आवश्यक)

२) स्मिता / संदेश चव्हाण, विद्यार्थी प्रतिनिधी, आदर्श विद्यालय, नवी पेठ, नागपूर येथून मा. व्यवस्थापक, सोलापूर साखर कारखाना, सहकार नगर, सोलापूर येथे पत्र लिहून कारखाना पाहण्याची अनुमती मागते/मागते. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या शाळेत साजरा करण्यात आलेल्या शिक्षक दिनाचा वृत्तांत लिहा.

**किंवा**

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

छत्रीची जाहिरात करा.

**प्र.८. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

१) माझे बाबा

(**मुद्दे :-** वडिलांचे कुटुंबातील स्थान - त्यांचे शिक्षण, व्यवसाय - नोकरी - दैनंदिन उपक्रम - स्वभाव - मुलांवर संस्कार - त्यांची विचारसरणी - त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा घरातील सदस्यावर होणारा परिणाम - त्यांचे महत्त्व - शेवट.)

२) पाऊस पडला नाही तर.....

(**मुद्दे :-** पावसाचे महत्त्व - जीवन जगण्यासाठी आवश्यक - पाण्याची आवश्यकता - नदी, नाले, कोरडे - मानव, पशू, पक्षी - भयानक वातावरण - कल्पनाच भयंकर - शेवट.)

३) फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त

(**मुद्दे :-** निर्मिती- त्यावेळी भोगाव्या लागणाऱ्या यातना - निर्मितीचा आनंद - त्यानंतरचा प्रवास - आजची स्थिती - अपेक्षा - शेवट.)

**Best Of Luck** 👍

**PAPER - V**

# MT-162

**2013 .... .... 1100**

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - V

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| १) | एकाच्या पाठोपाठ दुसरं, तिसरं ... नजर पाहू शकेल एवढी **शिखरंच शिखरं !** | 1 |
| २) | अशा समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे **हे आनंदवन निर्माण झाले.** | 1 |
| ३) | रामय्या धापा टाकीत **धावत आला.** | 1 |
| ४) | सूर्याच्या पिवळ्या तांबूस आणि कोवळ्या किरणात बाबूजी **अक्षरे हसत होती.** | 1 |
| उ.१. | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| १) | कधीकधी **दोन अबोल माणसे** एकमेकांच्या सहवासात येतात आणि अचानक दोघांनाही प्रिय असलेला विषय निघतो. | 1 |
| २) | सार्थक झालं आपल्या **आयुष्याचं**. | 1 |
| ३) | मा शिरखुर्मा आठ - दहा घागरीच्या मोठ्या **पातेल्यात** करायची. | 1 |
| उ.१. | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | लेखकाचे वडील स्वातंत्र्यआंदोलनात सन १९२० साली सहभागी झाले. | 1 |
| २) | कुष्ठरोगाच्या संशोधनासाठी बाबांनी स्वतःचे शरीर देऊ केले. | 1 |
| ३) | वसंत ऋतूचा वसंतोत्सव साजरा करावा, असे लेखिकेला वाटते. | 1 |
| उ.२. | **अ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'हिमालय' हा पाठ लेखक 'प्रभाकर पेंढारकर' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने हिमालयाचे मनाला मोहिनी घालणारे दर्शन घडविले आहे.<br>लेखक हिमालयाच्या पर्वत रांगांमधून फिरत असताना कॉंप्रेसर, बुलडोझर, जॅकहॅमर्स, कानठळ्या बसवणारे सुरुंग या सर्वांचे आवाज ऐकत होते. त्या दुर्गम भागात रस्ते बांधण्यासाठी चाललेल्या धावपळीचा तो आवाज होता. तो आवाज ऐकूनच लेखकाला वाटते रस्ता म्हणजे केवळ दोन बिंदूंना जोडणारं अंतर नसते किंवा वाहतुकीची केवळ सोय नसते. रस्ता ही त्या विभागातल्या आजवर उपेक्षिल्या गेलेल्या लोकांना सुधारणांशी जोडणारी एक साखळी असते. प्रगत विज्ञानानं माणसाला जे दिलं आहे. ते तिथल्या लोकांपर्यंत पोहोचवणारे ते एक साधन आहे. आशा आणि आकांक्षा, शिक्षण आणि ज्ञान त्यांच्यापर्यंत पाहोचविण्यासाठी रस्त्यांची गरज असते.<br>अशाप्रकारे रस्त्याने माणसांबरोबर त्यांचे प्रगतशील विचार प्रवास करतात. म्हणून, 'रस्ता म्हणजे केवळ दोन बिंदूंना जोडणारं अंतर नव्हे,' असे पेंढारकरांना वाटते. | 3 |

| | | |
|---|---|---|
| २) | ‘बाबूजी’ हा पाठ लेखक ‘संजय गिरासे’ यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने आपल्या मुला-मुलींसाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या आईवडिलांकडे मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे संवेदनशील मनाला खूप यातना होतात, याचे दर्शन घडविले आहे.<br>केशवने नाशिकला एक छोटासा बंगला बांधला होता. या बंगल्याला त्याने आपल्या वडिलांचे म्हणजे ‘बाबूजी’ हे नाव दिले होते. बंगल्याचा दिवाणखाना दृष्ट लागावी असा होता. त्याने हॉल, किचन, बेडरूम सगळीकडे स्पार्टेक बसवून घेतले होते. किचनच्या ओट्याला पंचवीस हजार रूपये खर्च आला होता. नऊ फूट लांबीचा ओटा होता आणि त्यावर ग्रीन मार्बल बसविले होते. साडेआठशे रूपयांचा नळ होता. त्याचबरोबर मिस्तरीला सांगून चार खुर्च्यांचा डायनिंग टेबल बनवून घेतला होता. बाथरूमला बसवलेली वाल टाईल्स खास इंदौरहून आणलेली होती. बेडरूम दुसऱ्या मजल्यावर होती. फॅशन नसल्यामुळे बाबूजींचा फोटो हॉलऐवजी जिन्यामध्ये लावला होता. बेडरूमच्या सजावटीसाठी पंचेचाळीस हजार खर्च केले होते. खिडक्यांना दोन्ही बाजूंनी ग्रील लावली होती. स्टोअर रूम चांगली होती. गच्चीवर त्याने झोपाळा लावला होता. वर लाईट लावलेला होता. शिवाय बंगल्याला ‘बाबूजी’ हे जे नाव दिले होते. ते खास ऑर्डर देऊन पुण्याहून बनवून घेतलं होतं. त्याला मर्क्युरी कोटिंग होती. त्यामुळे बंगल्याच्या जवळून जाणाऱ्या मेन हायवेवरून ते नाव ठळकपणे दिसतं. त्या नावामुळे बंगल्याला उठाव आलेला होता. या सगळ्याबरोबरच केशवने सुरक्षिततेसाठी दरवाजादेखील मजबूत करून घेतला होता. शिवाय चोरांनी कशाही प्रकारे दरवाजा उघडलाच तर आपोआप वाजणारी एक इलेक्ट्रॉनिक बेलही तेथे लावलेली होती.<br>अशाप्रकारे केशवने आपल्या ऐश्वर्यसंपन्न बंगल्याचे वर्णन केले आहे. | 3 |
| ३) | ‘संवाद, विसंवाद’ हा पाठ लेखिका ‘शांता शेळके’ यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने संवादाच्या विविध प्रकारांबद्दल त्यांतील अडथळ्यांबाबत माहिती सांगितली आहे.<br>एकमेकांविषयी जुजबी माहिती असलेल्या संवादात एक वेगळेच सुंदर मोकळेपण अनुभवायला मिळते. कारण परस्परांना नंतर कधी भेटू अशी भीती किंवा आशाही तेथे नसते. अशा संवादात व्यक्ति विषयक संदर्भाचे तपशीलाचे ज्ञान अपुरे असल्यामुळे गप्पा अधिक रंगतात. तसेच मतभेद होणे, मन दुखावले जाणे यांसारख्या गोष्टी अशा संवादात घडत नाही. गैरसमज होण्याची भीती नसते.<br>म्हणूनचं ‘जितकी ओळख कमी, जितकी व्यक्ती अपरिचित तितका संवाद अधिक रंगतो’ असे लेखिकेने म्हटले आहे. | 3 |
| ४) | ‘अपूर्व भेट’ हा पाठ लेखक ‘रणजित देसाई’ यांनी लिहिला आहे. या पाठात स्वामी विवेकानंदांचे भावचित्र राजा रविवर्मा यांना कसे भावले याचे चित्रण आलेले आहे.<br>राजा रविवर्मा यांच्या घरी आलेले स्वामी विवेकानंद उंचपुरे, गौरकांती लाभलेले होते. पायातील खडावा वाजवत धीम्या पावलांनी ते आत येत होते. त्यांच्या मस्तकी भगवा साफा होता. त्यांच्या अंगात भगवा अंगरखा आणि त्याच रंगाचे पायी धोतर होते. | 3 |

| | | |
|---|---|---|
| | स्वामींच्या गोऱ्या कपाळाखाली असलेल्या काळ्याभोर नेत्रांत एक अलौकिक तेज सामावलेलं होते. त्या तेजस्वी नेत्रांत शांत भाव तरळत होता. स्वामीजींचे ते तेज पाहून राजा रविवर्मा प्रभावित झाले. स्वामीजींच्या दर्शनाने त्यांचे अंतःकरण आनंदाने भरून गेले.<br>अशाप्रकारे स्वामी विवेकानंदांच्या तेजःपुंज व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झाल्याने राजा रविवर्मा भारल्यासारखा स्वामीजींकडे पाहत होते. | |
| ५) | <u>'माणुसकीचा झरा'</u> हा पाठ लेखिका <u>'चित्रलेखा पुरंदरे'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने 'आनंदवन' ही कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करण्यामागे बाबा आमटे यांची असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे.<br>बाबा आमटे वडिलांच्या इच्छेनुसार वकिली करत होते. पुढे ते वरोऱ्याच्या नगरपालिकेचे उपाध्यक्ष झाले. त्या कामाबरोबर त्यांचे इतर समाजकार्य चालू होते. हे कार्य करत असताना एके दिवशी त्यांना रस्त्याच्या कडेला असह्य वेदनांनी कण्हत असलेला एक महारोगी म्हणजेच तुळशीराम त्यांना दिसला. त्यानंतर अशा महारोग्यांची सेवा करण्याचे व्रत त्यांनी घेतले. वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने तुळशीरामचा मृत्यू झालेला पाहून त्यांना अतिशय दुःख झाले. त्यावेळी या वेदनेचे आनंदात रूपांतर करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. त्यातून साधनाताईंच्या मदतीने त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी 'आनंदवन' निर्मिले.<br>कुष्ठरोगाचा अभ्यास करण्यासाठी ते कलकत्त्याला गेले. कुष्ठरोग कोणत्याही प्राण्याला होत नाही. त्यामुळे यावरचे संशोधन करण्यालाही त्यांनी स्वतःचे शरीर देऊ केले. कुष्ठरोगाचे जंतू स्वतःच्या शरीरात वेचून घेण्यासाठी ते तयार झाले.<br>आनंदवनाच्या निर्मितीसाठी बाबांनी वरोऱ्याला श्रमाश्रमाचा प्रयोग केला. सर्व जातीधर्माच्या लोकांनी एकत्र आनंदाने राहायचे. प्रत्येकाने दिवसभर आपापले काम करायचे. संध्याकाळी जमलेल्या मजुरीतून भाजी-भाकरी बनवायची आणि मजेने खायची. बाबांची ही छोटी वसाहत अनेक वर्षे गुण्यागोविंदाने आनंदात राहत होती.<br>अशाप्रकारे समाजकार्यातून बाबा आमटे यांची संवेदनशील वृत्ती दिसून येते. | 3 |
| उ.२.<br>१) | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**<br>**<u>संदर्भ</u> :** वरील वाक्य <u>'काय राव पुस्तकराव'</u> या लेखक <u>'दासू वैद्य'</u> यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखक आपल्या जीवनातील पुस्तकांचे महत्त्व सांगतात. तसेच पुस्तकांची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करतात.<br>**<u>स्पष्टीकरण</u> :** मंदार आणि मानसी अभ्यास करताना पुस्तकांची योग्य काळजी घेत नव्हते. मंदारने अभ्यास झाल्यावर पुस्तक टाकून दिले आणि तो झोपला. मानसीसुद्धा पुस्तक वाचता वाचता झोपली. तेव्हा तिच्या अंगाखाली पुस्तक पार चुरगळून गेले होते. अशावेळी पुस्तकराव त्यांना समजावून सांगतात की, पुस्तकांचा उपयोग व्यवस्थित केला पाहिजे. त्यांची नीट काळजी घेतली पाहिजे. कारण पुस्तकांचा उपयोग जे व्यवस्थित करतात, तेच मोठे होतात, ज्ञानी होतात, विद्वान होतात. शिवाय पुस्तकांशी मैत्री करणारे कधीच | 3 |

| | | |
|---|---|---|
| | गरीब राहत नाहीत. मार्क्स, लेनिन, टॉलस्टॉय, शेक्सपीयर, कालिदास, महात्मा गांधीजी, लोकमान्य टिळक, पंडित नेहरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, रवींद्रनाथ टागोर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले अशा मोठ्या लोकांनी पुस्तकांचा योग्य व व्यवस्थित उपयोग केला म्हणून ते खूप मोठे झाले आहेत.<br>**वैशिष्ट्य :** ज्ञानी होण्याचा योग्य मार्ग पुस्तकरावांनी येथे दाखविला आहे. | |
| २) | **संदर्भ :** वरील वाक्य 'वारूळ' या लेखक 'अनिल त्र्यंबक अवचट' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखकाने वारूळाविषयी मुंग्यांची भावना तसेच मुंग्या आणि नागिणीचे परस्परसंबंध स्पष्ट केले आहेत.<br>**स्पष्टीकरण :** नागिणीची पिल्लं मोठी झाल्यावर मुंग्यांच्या पिल्लांबरोबर वारूळाच्या बाहेर जाऊ लागली. मुंग्यांची पिल्ले त्यांना आसपासचे रस्ते माहीत करून देत असत. त्यावेळी बोलता-बोलता त्यांना ते वारूळ पावसाळ्यात वाहून जाणार असल्याचे समजले. तेव्हा ती पिल्ले खूपच घाबरली. त्यांनी त्याबद्दल आईला विचारले. त्यावेळी तिने पावसाळ्यात दरवर्षी असेच घडत असल्याचे सांगितले. ती त्यांची भीती दूर करताना म्हणाली की, पावसाला सुरूवात व्हायच्या आधी आपण बाहेर पडू. नंतर सापटीत म्हणजेच खिंडारात किंवा वळचणीच्या जागी म्हणजेच छतावर राहण्यासाठी जागा बघू. ती जागा कोरडी असेल. तसेच माणसांच्या दृष्टीने अडनिडीची म्हणजेच अडगळीची असेल. माणसांची नजर न गेल्याने ती सुरक्षित जागा असेल.<br>**वैशिष्ट्य :** नागिणीची जगण्यासाठीची धडपड येथे दिसून येते. | 3 |
| उ.३. | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | संत सोयराबाई यांच्या मते संसाराचे सुख मृगजळासारखे आहे. | 1 |
| २) | कवीच्या मते माणसाला माणूस म्हणून किंमत यावी. | 1 |
| ३) | कवीला शिवारात सावळ्या रूपात श्याम दिसतो. | 1 |
| उ.३. | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| १) | सावरीत जखम खोल, **जगाचा** आला जरी बोल. | 1 |
| २) | नभी फडफडे उंच **तिरंगा**, मनात गंगा, हिमनग रांगा. | 1 |
| ३) | बालरवि-किरणांची नाचे इथे **प्रभावळ** ! | 1 |
| उ.४. | **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| १) | **संदर्भ :** वरील पद्यपंक्ती 'आजि सोनियाचा दिवस' या 'संत सेना महाराज' यांच्या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन या अभंगामध्ये केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** संतांच्या सहवासात खूप आनंद मिळतो. संत सान्निध्यात राहिल्यामुळे संत सेना महाराज यांच्या मनातील वाईट विचारांचा नाश झाला व मनाला शांतता लाभली. | 3 |

| | | |
|---|---|---|
| | संतचरण दिसल्यामुळे मनाचा व शरीराचा सारा थकवा दूर झाला आहे. दिवाळी-दसरा आल्यावर आनंदाला तोटा नसतो. घरी सुखाचे, समाधानाचे वातावरण असते. त्याचप्रमाणे संतांच्या भेटीमुळे सेना महाराज यांच्या मनाला दिवाळी-दसऱ्याप्रमाणे आनंद झाला आहे.<br>**वैशिष्ट्य :** येथे संत सेना महाराजांची आनंदी मनोवस्था दिसून येते. | |
| २) | **संदर्भ :** वरील पद्यपंक्ती 'गाव' या कवी 'अनिल पाटील' यांच्या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. या कवितेतून गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>**स्पष्टीकरण :** गावातील निसर्गसौंदर्याचे वर्णन कवी अगदी भावूकपणे करतो. त्याच्या गावी वेडीवाकडी वळणे घेत घेत वाहणाऱ्या नदीत खळखळणारे पाणी आहे. हे सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी सर्वत्र भिरभिरते. या सौंदर्याचे वर्णन करताना त्याला शब्दच सापडत नाहीत म्हणून त्याची वाणी अबोल होते. जणू निसर्गाच्या सौंदर्यात, त्या धुंद वातावरणात कवीचे मन शांत शांत होत जाते.<br>**वैशिष्ट्य :** निसर्गसौंदर्याचा मानवी मनावर होणारा सुखद परिणाम येथे दिसून येतो. | 3 |
| उ.४.<br>१) | **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.**<br>'माझ्या घरट्यात' ही कविता कवी 'सूर्यकांत खांडेकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा संदेश व्यक्त होतो.<br>कवीला आपल्या घरट्यात हिऱ्यामाणकांच्या राशीपेक्षा भावपूर्ण प्रेमळ अशी श्रीमंत हृदयाची माणसे महत्त्वाची वाटतात. कवीला घरात कल्पफुलांपेक्षा खऱ्या पारिजातकांच्या फुलांचा सभोवार दरवळणारा सुगंध अधिक महत्त्वाचा वाटतो. म्हणजेच खऱ्या प्रेमाचा, पावित्र्याचा गंध कवीला अनमोल वाटतो. कवीला केवळ स्वप्नरंजकतेपेक्षा स्वप्ने साकार करणारी मेहनती माणसे महत्त्वाची वाटतात. घरातील माणसांचा एकमेकांशी असणारा संवाद, विचारांतील एकोपा कवीला अधिक पसंत आहे. घरातील आनंदी वातावरण आणि मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य कवीला अधिक आवडते.<br>अशाप्रकारे कवीला आपल्या घरट्यात भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती दर्शविणाऱ्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. | 3 |
| २) | 'आपण धरणी गं' ही कविता कवी 'ऋषीकेश कांबळे' यांनी लिहिली आहे. या कवितेत स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देत आपले हक्क मिळवण्याचे आवाहन केले आहे.<br>कवितेतील स्त्री म्हणते की, स्त्री ही नवनिर्मिती करणाऱ्या धरणीचे रूप आहे. ती जशी सहनशील आहे तशीच धैर्यशीलही आहे. हे सगळे गुण आपल्या अंगी असूनही आपणाला का झुरत जगावं लागत आहे, असे ती विचारते. यावेळी ती स्त्री-शक्तीला जागृत करताना म्हणते की, आता मात्र आपले हक्क मिळविण्यासाठी अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. त्यासाठी सहकारी स्त्रियांना वाघवाघिणीचे रूप घेऊन आपले दुःख व अन्याय नष्ट केला पाहिजे असे ती सांगते. आजच्या नव्या युगातील या लढाऊ स्त्रीला कर्तबगार | 3 |

| | | |
|---|---|---|
| | स्त्रियांचा थोर वारसा लाभला आहे. ती म्हणते की, आपण भगवान बुद्धांची पत्नी यशोधरेच्या नाती आहोत. शिवरायांना जन्म देणाऱ्या जिजाऊ मातेचे वंशज आहोत. तसेच सावित्रीबाई फुले यांनी पेटविलेल्या ज्ञानाच्या ज्योती तर रमाबाईंनी प्रज्वलित केलेल्या ज्ञानाच्या वाती आहोत. अशी थोर परंपरा लाभल्यामुळे आपणही चंदनासारखे झिजून, आपल्या रक्ताचं पाणी करून समाजात समता निर्माण केली पाहिजे. पुढे ती स्वतःला दिव्याची उपमा देते. आपणही दिवा होऊन जळू व उजेडाची म्हणजेच आपल्या यशाची, स्वातंत्र्याची गाणी गाऊया असे ती आपल्या स्त्री-सहकाऱ्यांना सांगते.<br>अशाप्रकारे अन्यायाविरोधात लढणारी स्त्री धरणी, वाघवाघिणी, इतिहासातील थोर स्त्रिया, चंदन व दिवा या रूपांत कवितेतून व्यक्त झाली आहे. | |
| ३) | 'कृपा करी पंढरीनाथा' हा अभंग 'संत नरहरी सोनार' यांनी लिहिला आहे. या अभंगामध्ये भक्तांचा सांभाळ करणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा वर्णन केला आहे.<br>पंढरपूरचा पंढरीनाथ भक्तांवर नेहमीच कृपा करणारा कृपावंत आहे. तो दीन-दुबळ्यांची, गरीबांची मदत करणारा दीनानाथ आहे. जीवन जगत असताना भक्तांच्या हातून कळत नकळतपणे अनेक चुका, अनेक अपराध घडतात. पांडुरंग अशा भक्तांच्या अपराधांना क्षमा करतो. तो भक्तांचा सांभाळ करतो. ज्यांना कोणाचाही आधार उरलेला नाही अशा अनाथांवर कृपा करणारा तो कृपाळू आहे. भक्तांकडून अनेकवेळा अन्यायकारक गोष्टी घडतात. इतरांवर खूप अन्याय केले जातात. अशा वेळी माफी मागितली तर विठ्ठल अशा अन्यायी भक्तांनाही माफ करतो. अशा या पंढरीनाथाचा महिमा खरंच खूप अगाध आहे, अमर्याद आहे. कितीही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी तो समजत नाही.<br>अशाप्रकारे संत नरहरी सोनार यांनी पंढरीनाथाचा महिमा वर्णिला आहे. | 3 |
| ४) | 'प्रलय' ही कविता कवी 'रोहिदास पोटे' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनांनी जखडलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br>मानवी समाजामध्ये प्रलय निर्माण व्हावा, असे कवीला वाटते. जेणेकरून एकाच आकाराची, विचाराची, उंचीची, भेदाभेदरहित घरे निर्माण व्हावीत. माणसाला बदलण्यासाठी व माणसाला माणूस म्हणून किंमत यावी यासाठी नवीन विचारांचा समाज निर्माण व्हावा. विषमता नष्ट होऊन सर्वत्र समानता निर्माण व्हावी. 'माणूस' व 'माणुसकी' यांचे अतूट नाते निर्माण व्हावे. माणसाने माणसाशी माणूस म्हणून वागावे. मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध प्राप्त व्हावा.<br>अशाप्रकारे प्रलय होताना मानवी समाजात कवीला सकारात्मक बदल अपेक्षित आहे. | 3 |
| ५) | 'एकत्वाचे गीत महान' ही कविता कवयित्री 'आश्लेषा महाजन' यांनी लिहिली आहे. या कवितेत आपल्या देशात विविधतेत एकता कशी नांदते याचे सुंदर वर्णन केले आहे.<br>देशातील विविधतेतील एकतेचे वर्णन करताना कवयित्री इंद्रधनुष्याचे उदाहरण देते. जसे इंद्रधनुष्यात जरी विविध रंग असले तरी त्याची कमान एकच असते. तशीच भारतातही ही | 3 |

| | | |
|---|---|---|
| | विविधतेतील एकता दिसून येते. आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. या प्रांतातील लोकांची रूपे, त्यांची भाषा वेगळी आहे. परंपरा, पूजाअर्चा आणि परमेश्वर भक्तीचे त्यांचे मार्गही वेगवेगळे आहेत. त्याचबरोबर त्यांची वेशभूषा यामध्येही आपल्याला विविधता असल्याचे आढळून येते.<br>अशा विविध बाबींमुळे देशातील वेगळेपण दिसून येते. | |
| उ.५. | **खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** | |
| १) | <u>'मुलांचे स्वप्न'</u> हा पाठ लेखिका <u>'सोनाली नवांगुळ'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>चिनारचे आई व बाबा दोघंही एक छोटं हॉटेल चालवायचे. दोघेही दिवसभर या ना त्या कामात गुरफटलेले असायचे. आईबाबांची कामांची धांदल चिनारला कळायची. त्याला आपले आईबाबा खूप आवडायचे. चिनारचे आईबाबाही आपल्या चिनारचे कौतुक करायचे. त्याच्या शेजारचेही आपल्या मुलांना सांगायचे, ''बघा...बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.'' खरं तर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनारचे आईबाबा हॉटेलात दिवसभर काम करून फार दमायचे. कधी कधी तर चिनारचा अभ्यास घ्यायलाही त्यांना वेळ मिळत नसे. अशा वेळी आपल्या आईबाबांचे पाय दाबून द्यावेत, डोक्याला तेल लावावे, हॉटेलात काहीतरी मदत करावी असे चिनारला खूप वाटायचं. पण वेळच मिळत नाही. मनातून वाटूनसुद्धा आपण त्यांना काहीच मदत करत नाही. चांगली मुलं सगळ्यांना मदत करतात. आपण मात्र मदत करीत नाही. तरीही आपल्याला लोकांनी चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला वाटते.<br>अशाप्रकारे स्तुतीस पात्र नसतानाही लोकांनी केलेल्या स्तुतीमुळे आपण खोटारडे आहोत, असे चिनारला वाटते. | **4** |
| २) | <u>'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व'</u> हा पाठ लेखक <u>'आनंद यादव'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>प्रत्येक गावाची आपली एक संस्कृती असते. ती तेथील परंपरेमुळे निर्माण झालेली असते. हे समजावतांना लेखक म्हणतात की, पश्चिम महाराष्ट्राच्या एकाच पट्ट्यातील गावे एकसारखी नाहीत. त्यांची संस्कृती वेगळी आहे. कागल तालुक्यातील 'सागाव' हे पानमळ्याचे गाव म्हणून ओळखले जाते. 'सिद्धनेली' हे भात पिकविण्यासाठी प्रसिध्द आहे. 'कापशी' या गावातील सणगर समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात घोंगड्यांचे उत्पन्न काढतात. सातारा जिल्ह्यातील एक गाव शिक्षकांचे गाव म्हणून ओळखले जाते. तेथील माणसे शिकून शिक्षक होण्याचा प्रथम प्रयत्न करत असतात. पुणेरी पगडी, पैठणचा शालू, जेजूरीचा भंडारा, पंढरपूरचा बुक्का, सोलापूरची चादर ही स्थानिक गावांची वैशिष्ट्ये आहेत. त्या त्या गावांच्या त्या त्या वस्तू प्रतिष्ठेच्या समजल्या जातात त्यामुळे ती त्यांची संस्कृती बनलेली दिसते. | **4** |

| | | |
|---|---|---|
| | दूधकट्ट्यावर सकाळच्या वेळी दुधाच्या धंद्यासाठी जाणाऱ्या म्हशी हे कोल्हापुरच्या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. त्याच सकाळच्या वेळी पहिलवानांचा समूहही दुधकट्ट्यावरील दूध पिऊन आखाड्यात मेहनत करतो. काही पैलवान पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. पंढरपूरच्या चंद्रभागा स्नानाला मात्र पावित्र्याचा स्पर्श आहे. दोन्ही गंगास्नानेच आहेत पण त्यामागची सांस्कृतिक भावना वेगळी आहे. पंढरपूरची संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. ती विठ्ठलाच्या मंदिराच्या केंद्राभोवती निर्माण झाली आहे. त्याचबरोबर लाल लाल मातीच्या रस्त्यांचे देखणेपण आणि मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची ओळख आहे.<br>अशाप्रकारे वरील उदाहरणामुळेच 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते' हे स्पष्ट होते. | |
| ३) | <u>'प्रतिसरकार'</u> हा पाठ लेखक <u>'नागनाथअण्णा नायकवडी'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>१९२० नंतर स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व म. गांधी यांच्याकडे आले होते. सत्य, अहिंसा व सत्याग्रह यांच्या सहाय्याने हा लढा तीव्र बनला होता. याच काळात लेखक नागनाथअण्णा कोल्हापूरला 'प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग'मध्ये राहून शिक्षण घेत होते. लेखकाच्या लहानपणी नाना पाटील यांच्या वाळव्यात सभा होत होत्या. तेव्हा लेखक तिरंगी झेंडा खाद्यांवर घेऊन मिरवणुकीत अग्रभागी असायचे. कोल्हापूरात विद्यार्थिदशेतच लेखक राष्ट्रसेवादलात जाऊ लागले होते. तेथे वैचारिक प्रबोधन होत होते. त्या प्रबोधनामुळे इंग्रजांची सत्ता घालविण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावली पाहिजे ही जाणीव तीव्र होत होती. कोल्हापुरमध्ये त्या काळात स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून विद्यार्थी चळवळ जोमाने वाढत होती. त्याच निमित्ताने लेखकाने त्याच्या काही विद्यार्थी मित्रांसह मुंबईत धाव घेतली होती. स्वयंसेवकाच्या वेशात प्रवेश मिळविला होता. गांधीजीची पूर्ण स्वातंत्र्याची मागणी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या भावनाप्रधान व जोशपूर्ण भाषणाने लेखक भारावून गेले आणि शिक्षण सोडून पूर्णपणे स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःला झोकून द्यायला तयार झाले होते.<br>अशाप्रकारे नागनाथअण्णा यांनी विद्यार्थिदशेत स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. | 4 |
| ४) | <u>'नातवंडांस पत्र'</u> हा पाठ लेखिका <u>'मृणालिनी साराभाई'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून केला आहे.<br>लेखिकेला आपल्या नातवंडांबद्दल खूप प्रेम वाटते. तिला वाटते की, या मुलांना लाड करून घेण्याची, भरभरून प्रेम मिळण्याची सवय झाली आहे. सदैव आपली काळजी घेणारे कोणीतरी आहे हा विश्वास या मुलांना वाटतो. पण ही मुले जशी मोठी होतील तसे त्यांच्या लक्षात येईल की, या जगात वेगवेगळ्या वृत्तींची, स्वभावाची माणसे आहेत. घरात मिळणारे | 4 |

सौजन्यपूर्ण वातावरण बाहेरच्या जगात मिळणार नाही. हिंसा, अभिलाषा, मत्सर या अपप्रवृत्ती समाजात पसरलेल्या आहेत. दुर्दैवाने मुलांना शाळकरी वयात या गोष्टी शिकायला मिळत आहेत. लेखिकेला वाटते की, मुलांनी मोठे होता होता या शत्रूंना जिंकायला पाहिजे. त्यासाठी त्यांनी प्रत्येक दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करावी. खेळ खेळताना एकत्र खेळावे. शिवाय कुणाविरूद्ध द्वेष ठेवू नये. जितक्या जास्तीत जास्त जणांना आनंद देता येईल तेवढा त्यांनी दिला पाहिजे. साऱ्या जगासाठी त्यांनी स्वतः आदर्श बनले पाहिजे.

अशाप्रकारे रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने वागावे असे लेखिकेला वाटते.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**

१) 'नातवंडांस पत्र' हा पाठ लेखिका 'मृणालिनी साराभाई' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे. **8**

लेखिका आपल्या नातवंडांना पूर्णपणे ओळखते. त्यांच्या सवयी तिला माहिती आहेत. जगातील हिंसा, अभिलाषा, मत्सर या दुष्टप्रवृत्तीपासून तिला आपल्या नातवंडांस वाचवायचे आहे आणि म्हणून ती त्यांना म्हणते जेव्हा तुम्ही मोठे व्हाल तेव्हा या शत्रूंना जिंकून घ्या. यासाठी दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करा. त्यामुळे मनातील वाईट विचार दूर होतील. एकत्र खेळण्याने एकोपा वाढतो. पण असे साधे खेळ खेळतानासुद्धा कुणाचा द्वेष करू नका.

ज्या धरतीने तुमचे पालनपोषण केले तिचे ऋण मानायला विसरू नका. पाणी हे जीवन आहे, त्याचा जपून वापर करा. निसर्गाचे संवर्धन करा. निसर्गाचा समतोल कायम ठेवायचा असेल, पाऊस चांगला पडायला हवा असेल तर वृक्षांची जोपासना करायलाच हवी. जो शेतकरी त्याच्या देशासाठी अन्न पिकवतो त्याला किती कष्ट घ्यावे लागतात याचा विचार करा. आपण ब्रेड आणि लोणी ही न्याहारी करताना त्यासाठी कोणी किती कष्ट घेतले असतील याचा विचार करा. पुस्तक हे मित्र आहेत. तेव्हा ती वापरताना त्यांची काळजी घ्या. त्या पुस्तकात अनमोल ज्ञानाचे भांडार असते. पुस्तकातील शब्द म्हणजे मौज, कुतूहल असते. त्या शब्दांवर प्रेम करा. त्यांना वाचा म्हणजे सारे जग तुमच्यासाठी खुले होईल.

अशाप्रकारे शेवटी लेखिका आपल्या नातवंडास सांगते, स्वतः जगा व दुसऱ्यास जगू द्या. आपले जीवन इतरांना आनंद देण्यासाठी असावे. सर्वांना मदत करा आणि आपल्या कार्याने साऱ्या जगासाठी तुम्हीच आशीर्वाद व्हा.

२) 'मुलांचे स्वप्न' हा पाठ लेखिका 'सोनाली नवांगुळ' यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे. **8**

जुई आणि चिनार ही शहाणी मुलं होती. त्यांच्या शेजारचे आपल्या मुलांना सांगायचे, 'बघा, बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.' खरंतर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनार आणि जुईला मात्र वाईट वाटायचे. चिनार आणि जुईचे आईबाबा काम करून खूप

दमायचे. चिनारचे आई व बाबा दोघंही मिळून एक छोटं हॉटेल चालवायचे. जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. चिनार आणि जुई या दोघांना वेळच मिळत नसल्यामुळे मनात इच्छा असूनसुद्धा दोघेही आईवडिलांना कामात मदत करू शकत नव्हते. तरीही लोकांनी त्यांना चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे वाटून त्यांना त्या गोष्टीचं वाईट वाटायचे.

एके रविवारी जुई आणि चिनार एकमेकांना भेटले. चालता चालता एक फूल टपकून चिनारच्या डोक्यात पडले. जुईनेही फुलांच्या सड्यावर नजर टाकली. दोघांच्या डोक्यात एकाचवेळी एक विचार आला. कोणतेही झाड असो, ते किती उपयोगी पडते. त्यामुळे कसंही करून आपण झाड व्हायचं आणि सगळ्यांना खूप मदत करायची. आपल्याला झाड बनवावे यासाठी जुई आणि चिनार भैरू जादूगाराला भेटले.

भैरू जादूगर या विचित्र मागणीने चक्रावला. भैरू जादूगाराने जुई आणि चिनारची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण चिनार, जुई आपल्या म्हणण्यावरून हटले नाही. शेवटी जादूगाराला कबूल करावे लागले. भैरू जादूगाराने चिनार आणि जुईला संमोहित केले. चिनार चिंचेचे झाड आणि जुई चाफ्याचे झाड झाली होती. पण झाड झाल्यावर त्यांना बोलता येत नव्हते, हलता येत नव्हते. शेवटी ज्याला जे अवयव मिळालेत त्यांनी त्यांचा उपयोग करून शक्य तितकी मदत एकमेकांना करावी हे चिनार आणि जुईला पटले. झाडे खोड, पानं, फुलं, फळं, मुळं या अवयवांचा उपयोग करून मदत करतात. तसेच आपण हात, पाय, डोळे, बुद्धी, मन यांचा उपयोग करून जमेल ती मदत करायला हवी, असे चिनार आणि जुई यांच्या बालमनाला पटले.

उ.६. **अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.**

१) सहा **महिन्यानंतर** बाबूजी **पुन्हा** आजारी पडले. 2

२) हिमालयाचं मला झालेलं पहिलं **दर्शन** केवळ **अविस्मरणीय**. 2

उ.६. **आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | भाजीपाला | - | भाजी, पाला वगैरे | - | समाहार द्वंद्व समास | 1 |
| २) | मायबाप | - | माय आणि बाप | - | इतरेतर द्वंद्व समास | 1 |
| ३) | पासनापास | - | पास किंवा नापास | - | वैकल्पिक द्वंद्व समास | 1 |
| ४) | पंचारती | - | पाच आरत्यांचा समूह | - | द्विगू समास | 1 |

उ.६. **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)**

१) त्याची भाषा खूप वेगळी आहे. 1

२) हीच ओळख पुरेशी आहे का ? 1

३) भई, गल्लीत प्रत्येकाच्या घरी जाऊन आमंत्रण द्या. 1

| | | |
|---|---|---|
| उ.६. | **ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| १) | वर्गात पहिला क्रमांक आला हे कळताच प्राजक्ता **हर्षभरित झाली**. | **1** |
| २) | ताजमहालचे अप्रतिम सौंदर्य पाहून मुले **स्तंभित झाली**. | **1** |
| ३) | सुधीरने रवीला खूप समजावले पण रवीने त्याच्या सांगण्याचा **विपर्यास केला**. | **1** |
| ४) | जेव्हा बाबा रागावतात तेव्हा घरात कोणीही **अवाक्षर काढत नाही**. | **1** |
| ५) | विनाकारण एखाद्याला **उपद्रव देणे** हा जणू महेशचा छंदच बनला आहे. | **1** |
| ६) | रमेशच्या खोचक बोलण्याने सर्वांचे **मन दुखावले**. | **1** |
| उ.७. | **अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** | |
| १) | भारतीय संस्कृतीचा आत्मा कोण आहे ? | **1** |
| २) | कासव कशाची मूर्ती आहे ? | **1** |
| ३) | जगाचे स्वामी होण्यासाठी काय केले पाहिजे ? | **1** |
| ४) | देव आपलासा करून घेण्यासाठी काय केले पाहिजे ? | **1** |
| उ.७. | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 53 - Q.05 | **4** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 57 - Q.11 | **4** |
| उ.७. | **इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 90 - Q.05 | **4** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 96 - Q.11 | **4** |
| | **किंवा** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No.102 - Q.05 | **4** |
| | **किंवा** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 110 - Q.06 | **4** |
| उ.८. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 08 - Q.07 | **10** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 26 - Q.23 | **10** |
| ३) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 40 - Q.36 | **10** |
| | ❑❑❑❑❑ | |